नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०३ Issue - 103 | वार - रविवार दि. ६ सप्टेंबर २०२६ Blow- Sunday Date 6 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुंबईत तब्बल १६८ गोविंदा जखमी



## मुंबईत शहरातच तब्बल १०६ गोविंदा जखमी;तब्बल २९ जखमी गोविंदांना रुग्णालयांत दाखल करण्याची आली वेळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (विशेष प्रतिनिधी) : ढाक्कू माक्कूम, ढाक्कू माक्कूम....बोल बजरंग बली की जय., गोविंदा रे गोपाळा या गाण्यावर थिरकत थरांवर थर रचत शनिवारी मुंबईतील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न विविध गोविंदा मंडळांनी केला.

मात्र, हंडी फोडण्यासाठी थरांवर थर रचताना काहींचे मनोरे कोसळून त्यातील गोविंदा जखमीही झाले आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई महापालिका आणि शासकीय रुग्णालयंमध्ये तब्बल १६८ जखमी गोविंदा दाखल झाले होते. यातील २९ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले तर उर्वरीतांपैकी ८१ जवानांवर उपचार सुरु होते आणि ५८ गोविंदांवर उपचार करून सोडून देण्यात आले होते.

मुंबई महानगरीची एक महत्त्वाची सांस्कृतिक ओळख असणा-या दहीहंडीच्या कार्यक्रमात गोविंदा जखमी होण्याचे प्रकार घडू शकतात, ही संभाव्यता लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या शीव येथील लोकमान्य टिळक सर्वोपचार रुग्णालय, परळ येथील राजे एडवर्ड स्मारक (के. ई. एम.) रुग्णालय आणि मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालय आणि विशेष उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच १६ उपनगरीय रूग्णालयातही १०५ रूग्णशय्या सज्ज ठेवण्यात आले आहेत. या रुग्णालयांमध्ये प्रत्येकी ५ ते १० खाटांची व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली होती.

शनिवारी सकाळपासून मुंबईतील विविध भागांमध्ये मंडळांनी तसेच राजकीय व्यक्तींनी बांधलेल्या हंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथके गाड्यांनी रवाना झाली होती.

त्यामुळे संपूर्ण मुंबईत गोविंदांचा दर्शन घडत उंच लावलेल्या हंडया फोडण्यासाठी प्रत्येक मंडळांच्यावतीने मानवी मनोरे रचत थरांवर थर लावण्याचा प्रयत्न केला होता. काहींना यात यश होते तर काही पथकांच्या माध्यमातून केवळ सलामी दिली जात होती. परंतु हंडी फोडताना रचले जाणारे हे थर कोसळल्यामुळे अनेक ठिकाणी गोविंदा जखमी झाल्याच्या घटना पहायला मिळत होत्या.

मुंबईतील विविध सरकारी व पालिका रुग्णालयांकडून रात्री ९वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, दहीहंडी उत्सवादरम्यान एकूण १६८ गोविंदा जखमी झाले आहेत. यापैकी २९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर ८१ जणांवर उपचार सुरू आहेत, तर ५८ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

विभागनिहाय जखमी गोविंदांची आकडेवारी:

शहर विभागातील रुग्णालये: जखमी - १०६, दाखल - १८, उपचार सुरू - ५२, डिस्चार्ज - ३६

पूर्व उपनगरातील रुग्णालये: जखमी - २९, दाखल - ०८, उपचार सुरू - ०६, डिस्चार्ज - १५

पश्चि उपनगरातील रुग्णालये: जखमी - ३३, दाखल-- ०५उपचार सुरू - २१, डिस्चार्ज - ७

चींलरळ झेश्रळलश : मुंबईत ९ ते २३ सप्टेंबरदरम्यान कडक निर्बंध; ५ पेक्षा जास्त लोकांच्या जमावावर आणि डीजे-फटाक्यांवर बंदी

मुंबई : मुंबईत ९ ते २३ सप्टेंबर या कालावधीत कडक प्रतिबंधात्मक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. शांतता भंग, सार्वजनिक सुव्यवस्थेत अडथळा आणि जीवित अथवा ...

सर्वाधिक जखमी गोविंदांना उपचारासाठी दाखल करण्यात आलेली रुग्णालये:

केईएम रुग्णालय: जखमी - ३३ (सर्वाधिक), दाखल ०६,उपचार सुरू - १२, डिस्चार्ज - १५

नायर रुग्णालय: जखमी - १७, दाखल:०४, उपचार सुरू:१३, डिस्चार्ज ००

राजावाडी रुग्णालय: जखमी - २०, दाखल - ०५, उपचार सुरू - ०६, डिस्चार्ज - ०९

पोद्दार रुग्णालय: जखमी - १६, सर्व १६जण उपचार सुरु

हिंदुजा रुग्णालय: जखमी - १४, दाखल -०२, उपचार सुरू१२, डिस्चार्ज -००


सायन रुग्णालय: जखमी - ०८, दाखल -०४, उपचार सुरू ०४, डिस्चार्ज ००

कांदिवली डॉ आंबेडकर रुग्णालय: जखमी -१३, दाखल -२, उपचार सुरू-०४, डिस्चार्ज -०७

# अधिकारांना कात्री लावली नाही, मी स्वत: अधिकार विभाजित केले!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या मान्यता आणि ना-हरकत प्रमाणपत्रांसंबंधीचे महत्त्वाचे अधिकार शिक्षणमंत्र्यांकडून काढून घेतल्याची चर्चा रंगली असताना, खुद्द शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. मंत्र्यांच्या अधिकारांना कात्री लावण्यात आलेली नसून, प्रशासकीय कामात सुटसुटीतपणा आणण्यासाठी आणि कामांची गर्दी होऊ नये म्हणून हा निर्णय आपण स्वत: घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



**शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे स्पष्टीकरण; नव्या शाखांना मान्यता देण्याचे अधिकार सचिव व आयुक्तांकडे सोपवण्याचा निर्णय स्वत: घेतल्याचा दावा**

राज्य सरकारच्या प्रशासकीय कारभारात गतिमानता आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाशी संबंधित काही अधिकार विभागाचे प्रधान सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे सोपवण्यात आले आहेत. या निर्णयानुसार, आता स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये अतिरिक्त तुकड्यांना व नव्या शाखांना मान्यता देणे, तसेच सीबीएसई, आयसीएसई यांसारख्या विविध मंडळांच्या अभ्यासक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार सचिव आणि आयुक्तांकडे असतील. पूर्वी या सर्व प्रस्तावांसाठी मंत्रालयात आणि मंत्री स्तरावर पाठपुरावा करावा लागत होता.

या बदलांमागे 'विकसित महाराष्ट्र २०४७' आणि शंभर टक्के ई-गव्हर्नन्स हे उद्दिष्ट असल्याचे भुसे यांच्याकडून सांगण्यात आले आहे. राज्यात सुमारे ३१ हजार खासगी शाळा कार्यरत असून, वाढत्या शहरीकरणामुळे शाळांच्या मान्यता व नूतनीकरणाचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर येतात. हे अधिकार विकेंद्रित करून योग्य त्या स्तरावर दिल्याने प्रस्तावांच्या मंजुरी प्रक्रियेला वेग येईल आणि शाळा व्यवस्थापनांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नेपाळमध्ये चमत्कार! कुटुंबानं अंत्यसंस्कार केले; १० दिवसांनंतर महिला ढिगाऱ्यातून जिवंत बाहेर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काठमांडू: नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरानं हजारो लोकांचं आयुष्य उद्धवस्त केलं. या नैसर्गिक संकटात आतापर्यंत १३४४ जणांचा जीव गेला आहे. तर पाच हजार जण अद्यापही बेपत्ता आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. या सगळ्यात नुवाकोट जिल्ह्यात चमत्कारिक घटना घडली आहे. बिदूरमध्ये १० दिवस ढिगाऱ्याखाली अडकलेली ६० वर्षीय महिलेला जिवंत बाहेर काढण्यात आलं आहे.



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नेपाळच्या नुवाकोटमधील बिदूर शहरातील एका चार मजली घराच्या चौथ्या मजल्यावरून ६० वर्षीय महिलेला बाहेर काढण्यात आलं. जवळपास १० दिवस ही वृद्ध महिला ढिगाऱ्याखाली अडकली होती. चंद्रिका श्रेष्ठ असं या महिलेचं नाव आहे. नैसर्गिक आपत्तीनंतर त्यांचा शोध लागला नाही. बरेच दिवस ठावठिकाणा न सापडल्यानं कुटुंबियांनी त्यांना मृत मानलं. चंद्रिका यांच्या कुटुंबियांनी त्यांच्यावर प्रतिकात्मक अंत्यसंस्कारदेखील केले होते.

नेपाळ पोलिसांनी सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडीओ शेअर केला आहे. त्याच बचाव पथक ढिगारा आणि चिखल हटवताना दिसत आहे. चंद्रिका यांच्या घराच्या सर्वात वरच्या मजल्यावरील खिडकीतून बचाव पथकानं त्यांची सुटका केली. व्हिडीओमध्ये चंद्रिका श्रेष्ठ बेशुद्धावस्थेत दिसत आहेत. बचाव पथकातील कर्मचाऱ्यांनी त्यांना जॅकेटनं झाकलं आहे. त्यांना शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

नऊ सदस्यांच्या सशस्त्र पोलीस दलानं चंद्रिका यांना सुरक्षित बाहेर काढलं. मग त्यांना हेलिकॉप्टरमधून त्रिशुलीमध्ये नेपाळी सैन्याच्या मैथिली बराकीत उपचारांसाठी पाठवण्यात आलं. सशस्त्र पोलीस दलाचे उपप्रवक्ते शैलेंद्र थापा यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या चंद्रिका यांना वैद्यकीय उपचारांसाठी काठमांडूला नेण्यात येत आहे.

२६ ऑगस्टला नेपाळमध्ये भीषण पूर आला. नेपाळ आणि तिबेटच्या सीमेवर असलेले हिमकडे तुटल्यानं त्रिशुली आणि भोटे कोशी नद्यांची पाणी पातळी अचानक वाढली. पाण्याचा प्रवाह प्रचंड वेगानं नागरी वस्त्यांमध्ये शिरला. या पुरात आतापर्यंत १३४४ जणांचा मृत्यू झाला असून ५ हजार अद्यापही बेपत्ता आहेत. आतापर्यंत १३ हजार जणांना वाचवण्यात यश आलं आहे.

# संयुक्त राष्ट्राने जगाचा नकाशा बदलला, अमेरिकेने केला निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जगाचा नकाशा आता काहीसा वेगळा दिसेल. संयुक्त राष्ट्र महासभेने एक ऐतिहासिक ठराव मंजूर केला असून भारतानेही या ठरावाच्या बाजूने मतदान केले. याच्या विरोधात मतदान करणारा अमेरिका हा एकमेव देश होता. या निर्णयामुळे देश आणि खंडांच्या क्षेत्रफळावर परिणाम होणार नाही; त्यांचा आकार पूर्वीपेक्षा किंचित मोठा किंवा लहान दिसू शकतो. आतापर्यंत, पृथ्वीवरील देश आणि खंड दर्शवण्यासाठी मर्केटर जागतिक नकाशाचा वापर केला जात होता. यामध्ये, देश आणि खंडांचा आकार त्यांच्या वास्तविक क्षेत्रफळापेक्षा मोठा किंवा लहान दिसत असे. नवीन नकाशाला 'इक्वल अर्थ प्रोजेक्शन' म्हटले जाते. यामध्ये, आफ्रिका लक्षणीयरीत्या मोठा दिसेल, तर युरोप आणि उत्तर अमेरिका लहान दिसतील. आशियाचे काही भागही लहान दिसतील.

भारत: क्षेत्रफळ तेच राहील, आकार मोठा दिसू शकतो

भारताचे वास्तविक भूक्षेत्रफळ, आंतरराष्ट्रीय सीमा किंवा भूक्षेत्रफळात कोणताही बदल होणार नाही. या बदलामुळे देशांच्या सीमा बदलणार नाहीत, परंतु नकाशांवर पृथ्वी दर्शवण्याची पद्धत बदलेल.

भारताचा नकाशाही किंचित वेगळा दिसू शकतो, परंतु हा बदल लक्षणीय नसेल.

नवीन नकाशा क्षेत्रफळाचे प्रमाण अचूकपणे दर्शवतो. जुन्या नकाशात, विषुववृत्ताजवळील क्षेत्रे त्यांच्या वास्तविक आकारापेक्षा लहान दिसतात, तर ध्रुवांजवळील क्षेत्रे मोठी दिसतात. भारत विषुववृत्तापासून फार दूर नाही, त्यामुळे जुन्या नकाशात त्याचा आकारही काहीसा लहान दिसतो.

**व्ही. राधा अध्यक्ष, यूपीएससीच्या माजी सदस्यांसह पोलीस महासंचालक, आयआयटीच्या प्राध्यापकांचा समावेश**

# पेपरफुटी रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून उच्चस्तरीय समितीची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सरकारी भरती परीक्षांच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत असताना, राज्य सरकारने संपूर्ण परीक्षा पद्धतीचाच साकल्याने फेरआढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती उमेदवारांच्या हाती पडेपर्यंतची प्रक्रिया, परीक्षा केंद्रांची सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर, बनावट उमेदवार, प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकार, प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर आणि निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समितीत समावेश आहे. याशिवाय लोकसेवा आयोगाचे (यूपीएससी) माजी सदस्य निवृत्त एअर मार्शल अजित शंकरराव भोसले, आयआयटी मुंबईतील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे हेही समितीचे सदस्य आहेत.

राज्यातील विविध विभाग, प्राधिकरणे आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांकडून राबविल्या जाणाऱ्या भरती परीक्षांच्या सध्याच्या पद्धतीचा आढावा समिती घेणार आहे. परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि निष्पक्ष करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांच्या शिफारशी करण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे, त्यांचे परीक्षण आणि मॉडरेशन, एकापेक्षा अधिक प्रश्नसंच तयार करणे, प्रश्नपत्रिकांची मुद्रित किंवा डिजिटल पद्धतीने वाहतूक व वितरण, त्यांची गोपनीयता आणि अभिरक्षा, परीक्षा संचालन, उमेदवारांच्या प्रतिसादाची नोंद, मूल्यमापन आणि निकाल जाहीर करण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा अभ्यास केला जाणार आहे. या प्रत्येक टप्प्यावर कोणत्या सुरक्षा उपायांची आवश्यकता आहे, याबाबत समिती सरकारला शिफारशी करणार आहे.

भरती परीक्षांमध्ये माहिती तंत्रज्ञान, डिजिटल प्रणाली आणि सुरक्षा तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करण्यावर समितीचा भर असेल. आवश्यक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, 'ऑडिट ट्रेल्स', देखरेख आणि अन्य तंत्रज्ञानाधारित सुरक्षा उपाय सुचविण्याचे कामही समिती करणार आहे. प्रश्नपत्रिका फुटणे, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता भंग होणे, तोतया उमेदवार, उमेदवारांचे संगनमत आणि प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सध्याच्या यंत्रणेचाही आढावा घेतला जाणार आहे. गैरप्रकार रोखण्याबरोबरच ते शोधून काढण्यासाठी प्रतिबंधात्मक, देखरेखविषयक आणि उत्तरदायित्व निश्चित करणाऱ्या उपाययोजना सुचविण्याचे निर्देश समितीला देण्यात आले आहेत.



राज्यातील भरती परीक्षांची पद्धत सुधारताना विद्यमान व्यवस्थेपुरते समितीचे काम मर्यादित राहणार नाही. अन्य राज्यांमध्ये अवलंबल्या जाणाऱ्या उत्तम पद्धतींचा आणि आवश्यकतेनुसार अन्य देशांतील परीक्षा प्रणालींचाही अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रांची निवड, पायाभूत सुविधा, देखरेख, सुरक्षा, मनुष्यबळ आणि कार्यसज्जता यासाठी किमान मानके निश्चित करण्याची शिफारसही समिती करणार आहे. - भरती परीक्षा सुरळीत आणि सुरक्षित पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागातील संबंधित प्राधिकरणे, परीक्षा घेणाऱ्या संस्था आणि अन्य यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वयासाठी संस्थात्मक कार्यपद्धती सुचविण्याचे कामही समितीवर सोपविण्यात आले आहे. - विशेष म्हणजे समिती राज्यातील प्रत्येक महसुली विभागाला भेट देणार आहे. विद्यार्थी आणि उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच अन्य संबंधित घटकांशी प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन चर्चा करून त्यांच्या सूचना आणि मते जाणून घेतली जाणार आहेत. उमेदवारांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण, त्यांच्याशी संवाद आणि परीक्षा प्रक्रियेबाबतचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी उपाय सुचविण्याची जबाबदारीही समितीला देण्यात आली आहे. - समितीने या सर्व बाबींचा साकल्याने अभ्यास करून संबंधित हितधारकांशी संवाद साधावा आणि त्यांच्या सूचना-अभिप्रायांचा विचार करून सर्वसमावेशक अंतिम अहवाल सरकारला सादर करावा, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

# कृष्णामाई उत्सव : अष्टादि तीर्थाटनांचा अलभ्य लाभ

**(६-१२ सप्टेंबर: कृष्णामाई उत्सव विशेष.)**


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कृष्णामाई उत्सव हा कृष्णा नदीशी संबंधित एक प्रमुख धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे, जो प्रामुख्याने महाराष्ट्रात साजरा केला जातो. महाराष्ट्रात कृष्णा नदीच्या काठावर वसलेली वाई, कराड, संगम माहुली आणि लिंब यांसारख्या गावांमधील घाटांवर हा उत्सव मोठ्या उत्साहात होतो. सांगलीतही विविध उपक्रमांनी हा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव दरवर्षी माघ शुक्ल प्रतिपदा ते फाल्गुन पौर्णिमा या कालावधीत संपन्न होतो. या काळात रोज सकाळी लघुरुद्र, सप्तशती पाठ, विशेष पूजा, मंत्रजागर आणि संध्याकाळी आरती केली जाते. रोज संध्याकाळी भजने, हळदीकुंकू, तसेच कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, गायन आणि नृत्य यांचे आयोजन केले जाते. उत्सवादरम्यान प्रत्येक घाटावर महाप्रसादाचा कार्यक्रम होतो, ज्यामध्ये हजारो भाविक सहभागी होतात. शेवटच्या दिवशी ललिताच्या कीर्तनाने या उत्सवाची सांगता होते. या उत्सवामध्ये सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येतात. घाटावर महिलांचे हळदीकुंकू आणि इतर सामाजिक कार्यक्रम होऊन सामाजिक समतेचा आदर्श पाहायला मिळतो. वाईच्या कृष्णामाई उत्सवात याबद्दलची माहिती अधिक लोकाभिमुख करत सांस्कृतिक वारसा जपला जातो. सांगलीतही कृष्णा नदीच्या महोत्सवानिमित्त दीपोत्सव आणि नद्यांच्या पूजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

कृष्णा नदी ही साक्षात विष्णुस्वरूप आणि वेणी ही शिवस्वरूप असून दोन्ही नद्या एक अभिन्नपणे वाहतात. कृष्णा नदीला संपूर्ण कृष्णा हे नाव नसल्यामुळे तिला कृष्णावेणी असे संबोधतात. अशा या दोन नद्या व शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी तथा सरस्वतीवरून पंचगंगा असे सात मिलन श्रीनरसिंहवाडी या क्षेत्री आहेत. आसमंतात श्रीदत्तगुरुंचा संचार झाल्याने त्यांच्या रजःकणांनी हे क्षेत्र अत्यंत पवित्र आहे. श्री दत्तमहाराजांचे हे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पवित्र अशा या कृष्णा तटावर देववर्षी, राजर्षी, महान तपस्वी साधू आणि धर्मनिष्ठ लोक मोठ्या आनंदाने आणि सुखाने येतात. त्यांनी आपले पुण्याश्रमही या तीरावर कायम राहण्यासाठी थाटले आहेत. अनेकदा श्रीनरसिंहवाडी क्षेत्र हे भूवैकुंठ म्हणून गणले गेले आहे. या कृष्णातीरावर शुक्लतीर्थ, पापविनाशी, काम्य, सिद्ध, अमर, कोटी, शक्ती व प्रयागती अशी अष्टतीर्थे असून ती पवित्र व रमणीय आहेत. ही तीर्थे सर्व महापातके- कायिक, वाचिक व मानसिक पापांचे निर्दालन करणारे आहेत. दर्शनमात्रे सर्व पातकांचा नाश होतो तर प्रत्यक्ष स्नान आणि तीर्थ जलपान घडत असताना सर्व पातकांचा नाश तर होईलच संशय काय! या अमर क्षेत्रास अपूर्व असे पावित्र्य प्राप्त आहे.

या स्थानी वास घडावा अशी योगी, ज्ञानी, भक्तजन इच्छा करतात. येथे वापरल्या जाणाऱ्या परमेश्वराच्या तादात्म्यात संपूर्ण आनंदच अधिक आवडतो. या तीर्थराजांच्या दर्शनाने तात्काळ सर्व जीवांची पातके नष्ट होतात. अतिरिक्त आत्मिक, आधिदैविक व अधिभौतापही नष्ट होऊन चित्तवृत्ती शांत होते. राजाधिराज श्रीदत्तमहाराजांची चिरकाल वास करण्याची ही पुण्य क्षमता व राजधानी आहे-

श्रीदत्ताची राजधानी ।  
पाहोनि धन्य होती जीवनी ।।  
चारी पुरुषार्थुनी ।  
अंती जाती स्वर्गासी ।।




राजा ज्याप्रमाणे आपल्या राजधानीत फक्त सिंहासनावर बसून प्रजाजनांची गाऱ्हाणी ऐकतो व दुःखे दूर करतो, तद्वत् श्रीदत्तमहाराज या राजधानी सिंहासनावर विराजमान होऊन उच्चभूतप्रेतपिशादि सर्व पीडा दूर करतात व आपल्या भक्त जनांना सुखमय करतात. हे श्रीदत्ताचे जागृतस्थान म्हणून गणले आहे. अशा या परमपावन रमणीय सप्तनद्यांच्या संगमाने पवित्र सप्त संगम स्थानावर श्रीदत्तप्रभूंचा द्वितीय अवतार झाला. भगवान नरसिंहसरस्वती महाराजांनी बारा वर्षे सातत्याने आपल्या तपश्चर्येने ही भूमी पवित्र केली व भक्त लोक मनोकामना पूर्ण करण्यासाठी येतात. जेथे आपल्या ''मनोहर पादुका'' ठेवल्या त्या स्थानावर त्यांच्या मनोहर दर्शनाने आज सर्वांची कामना पूर्ण केली जाते. श्रीक्षेत्र नरसिंहवाडी येथे गेल्या सव्वाचारशे वर्षांपासून श्रीकृष्णवेणी उत्सव मात्र घडत असतो. दहा दिवस चालणार्या उत्सवात पुराण याविषयासाठी कृष्णामहात्म्य सांगतो.

नदी माहिती: कृष्णा नदी दक्षिण भारतातील एक प्रमुख नदी असून पाण्याची आवक व नदीपात्राच्या क्षेत्रफळाच्या बाबतीत देशातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी नदी आहे. कृष्णा महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यातून सुमारे १३०० किलोमीटरचा प्रवास करून बंगालच्या उपसागराला मिळते. सातारा जिल्ह्यातील सह्याद्रीच्या डोंगर रांगेत असलेल्या महाबळेश्वर मधील पंचगंगा मंदिराजवळ कृष्णेचा उगम होतो. याच परिसरात कृष्णा बरोबर कोयना, वेण्णा, सावित्री, गायत्री या नद्यांचाही उगम होतो व त्या वेगळ्या दिशांनी वाहत जातात. यातील सावित्री व गायत्री पश्चिम वाहिनी नद्या असून त्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात, तर वेण्णा व कोयना या कृष्णाच्या उपनद्या असून त्या दक्षिणवाहिनी आहेत. कृष्णा पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून तिच्या उगमाजवळ महाबळेश्वरमध्ये ६२५ से.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद होते. तर जवळच असणाऱ्या पाचगणीमध्ये सरासरी २५० से.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद होते. कृष्णेचे पात्र उन्हात कोरडे पडत असल्याने नदीवर जागोजागी धरणे बांधून पाणी अडविण्यात आले आहे. सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात आली आहे. कृष्णा महाबळेश्वरमधून खाली उतरून वाई मार्गे माहुली येथे येते, याच ठिकाणी तिला वेण्णा येऊन मिळते. पुढे माहुलीपासून ५० किमी अंतरावर असलेल्या कराडमध्ये तिला कोयना मिळते, याला कृष्णा कोयनेचा प्रीतिसंगम असेही म्हणतात. कराडपासून पुढे जात असताना तिला सांगलीमध्ये पुर्वेकडुन येरळा तर पश्र्चिम बाजूने वारणा येऊन मिळते, तसेच कुरुंदवाडमध्ये पंचगंगा येऊन मिळते. पंचगंगेच्या संगमावर नरसिंहवाडी हे श्रीदत्ताचे जागृत देवस्थान आहे. याच्यानंतर दुधगंगा नदी येऊन मिळते व अखेर महाराष्ट्रातील आपला ३०० किमीचा प्रवास करून कृष्णा कर्नाटक राज्यात प्रवेश करते. बेळगांव जिल्हातून कृष्णा पुर्व वाहीनी होते, विजापूरमध्ये तिला घटप्रभा नदी येऊन मिळते, याच ठिकाणी गोकाकचा प्रसिद्ध धबधबा आहे. पुढे तेलंगणाच्या सिमेवर रायपूर येथे भिमा नदी येऊन मिळते. पुढचा प्रवास करत असताना तुंगभद्रा नदीचा संगम होतो. यानंतरच्या प्रवासात तिला दिडी, मुसी, पालेरु, मुनेर, आदी नद्या येऊन मिळतात. विजयवाडा येथून पुढे कृष्णेचे ३ प्रवाह होऊन त्रिभुज प्रदेशाची निर्मिती झाली आहे. या त्रिभुज प्रदेशात कालवा जोड प्रकल्प राबवून यातून जलवाहतूक केली जाते. शेवटी ती आंध्रप्रदेशातील राजामहेंद्री येथे बंगालच्या उपसागराला मिळते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! कृष्णामाई उत्सवाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**  
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**  
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**  
**फक्त व्हॉट्सप-**  
**९४२३७१४८८३.**

# होय मी मदिराच (दारु) बोलतेय!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मी बळंनी कुणाकडे जात नाही, मी स्वतःहून कोणाच्या प्रेमात पडत नाही, मला कोणाला दुःख द्यावं असं वाटत नाही ना मला कुणाला उगीच त्रास द्यावा असं कधीच वाटत नाही, होय मी मदिराच बोलतेय !

तुम्हीच मला रात्री बे रात्री शोधत येता, मधीरा कुठे आहे? मदिरा कुठे मिळेल का? म्हणता, तशी मी खुप घाणेरडी आहे,मी विषारी आहे,मी महागडीही आहे हे माहीत असतानाही तुम्हीच माझ्या प्रेमात पडता, होय मी मदिराच बोलतेय !

मी सर्वांना समानतेची वागणूक देते, जात धर्म, वर्ण हे मी पाहत नाही, लहान असो वा मोठा असो,काळा असो वा गोरा असो हे मी बघत नाही,तुमची इच्छा मी कधीच मारत नाही. कधी एकदा माझ्यावर अटॅक होतो हे मला कळत नाही, चेस चेस करून माझा पहिला घोट आनंदाने तुम्हीच घेता होय मी मदिराच बोलतेय !

पहिलेच्या काळात माझ्यावर थोडीच लोकं प्रेम करीत होते,मी मर्यादित होते,आता घरोघरी माझ्यावर भरभरून प्रेम करीत आहेत, लोकं पहिले माझ्यावर चोरून चोरुन प्रेम करायचे, आता उघड उघड माझ्याबरोबर प्रेम करतात,मला घरी घेऊन जातात,मला जपतात,कपाटात,टेबलात मला ठेवतात,बायकोला जपत नाहीत,पण मला खुप जपतात,मी आता सर्वांसाठी खुली आहे,कुठेही उपलब्ध आहे होय मी मदिराच बोलतेय !

पहिल्यांदा जो कोणी येईल त्याला मी सांगते मला शिवू नका, मला स्पर्श करू नका, माझे चारित्र्य खराब आहे,मी अवदसा आहे,अनेक लोकांनी मला उपभोगलेले आहे, माझ्यापर्यंत जो कुणी आला तो सरळ कधीच गेला नाही, याची मलाच आज घृणा वाटतं आहे, किती लोकांना मी उध्वस्त व बदनाम करत आहे होय मी मदिराच बोलतेय !

मी एकदा पोटात शिरले तर कुणाला हसवते तर कुणाला रडवते, कुणाला पोपटावणी बोलायला लावते तर कुणाला बेशुद्ध करून गुंगी आणते,वेडं करते, अंगावरचे कपडे उतरवते, कुणा कुणाचे लिव्हर मी हळूहळू कुर्तडते तर कुणाच्या तोंडावाटे वा गांडीवाटे सळासळा बाहेर येते होय मी मदिराच बोलतेय !

आनंदाच्या व दुःखाच्या क्षणी मी त्यांना हवी आहे,ताण आलं टेन्शन आलं त्यांना मीच पाहिजे असते,वाढदिवस असो,एखादी नवीन आनंदाची घटना घडली असेल तर पार्ट्या देऊन एन्जॉय करताना माझ्याशिवाय त्यांना पर्यायच नाही माझ्याशिवाय समारंभ होतच नाही, महापुरुषांच्या जयंत्यामध्येही आता माझा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला आहे, मला जाळून जाळून भट्टीतून काढत होते आता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून राजरोसपणे दुकानात दर्शनी भागात माझे उंचीचे स्थान बनले आहे होय मी मदिराच बोलतेय !

मी अनेकांचे संसार उध्वस्त करत आहे, अनेकांच्या घराला कुलपं लावत आहे, बायको सोडून जाते,मुल बाळं दूर होतात मी फारच महाभयंकर व क्रूर असल्याने अनेकांचे लिव्हर खराब करून अनेकांना देवाघरी पाठवून माझ्या बहिणीचे कपाळ पांढरे करीत आहे,त्यांना मी कर्जबाजारी करून समाजात कुटुंबात कुठही त्याची इज्जत मी ठेवत नाही ,ती मी वेशीला टांगते, त्यांच्या बायका पोरांना खूप वाईट दिवस आणते होय मी मदिराच बोलतेय !

मला प्राशन करून कुणीही धनवान झाला नाही, मनोरंजन व करमणुकीचे साधन म्हणून माझा ज्यांनी ज्यांनी घोट घेतला, त्यांच्या शरीरात मला बंदिस्त केलय त्याला मी कधीच कच्च सोडलं नाही, मी अनेकांची फोटो वाढवली गोल गोल ढेरी वाढवते हातापायांच्या काड्या करते, दम्याचा त्रास निर्माण करते, बीपी वाढवते आणि एक दिवस अटॅक आणून त्याला पुढे घालूनच मी घेऊन जाते होय मी मदिराच बोलतेय !

पुरुष लोकं जसं माझ्या प्रेमात पडतात तशा बायकाही माझ्या प्रेमात पडून आपले कुटुंब उध्वस्त करीत आहेत,पुरुषासारखा नंगानाच सुरू केला आहे,शाळा कॉलेजमधल्या पोरींनी माझी वाट धरली आहे,माझी संगत हीच आयुष्यातील आनंदायी क्षण आहे असं वाटून मला गिळंकृत करून, आपल्या चारित्र्याचे धिंडवडे काढत आहेत,आई बाप पती भावांना धोका देऊन माझ्याबरोबर महिला वर्गानं अश्लील पणाचा कळस गाठला आहे, आई बापाची नवऱ्याची इज्जत आज त्या वेशीला टांगून स्वतःला आज संपवून घेत आहेत होय मी मदिराच बोलतेय !

मी खुप कडक होते लांबून जरी काडी पेटवली तरी माझा मोठा भडका उडत होता, माझा एक घोट घेतला तरी मी त्याचे आतडे,पोटामधल्या अवयवात घुसून ते जाळतच होते पण माझा कडकपणा,माझा रागीटपणा कमी झाला आहे, माझ्यात पाणी जास्त घालून,पाणी मिसळुन माझी प्रतिष्ठा आज कमी करत आहेत माझ्यावर लाखो रुपये कमावून मला फुटकळ बाजार दाखवत आहेत, त्या स्वार्थी लोकांना मी सुखा सुखी कधीच जगू देणार नाही, एक दिवस मी त्यांचाही शेवट करणारच आहे होय मी मदिराच बोलतेय !

माझ्या जीवावर पोलीस डिपार्टमेंट मोठे झाले,माझे हप्ते घेत राहिले,माझी विक्री करणा-या विक्रेत्यांना आसरा व आधार दिला आहे, माझ्या जीवावर माझी विक्री करणारे दुकानदार आज मोठे झाले आहेत, हप्ते घेणारे दलालही माझ्यामुळे स्टार्चच्या कपड्यात आणि चारचाकी गाडीत फिरत आहेत,बेवड्यानो तुम्ही मात्र गटार गंगेत न्हाऊन जाताय ,घरातून बायकोचे मंगळसुत्र,भांडी कोंडी चोरून आणून माझी भरती करत आहात, तुमच्या पोटात भाकरी पेक्षा फक्त मीच भरलेली आहे आणि मीच तुम्हाला हवी आहे होय मी मदिराच बोलतेय !

शेवटी मी तुम्हाला हात जोडुन विनंती करते मी निसंग आहे मी वाईट आहे मी खराब आहे मी अघोरी आहे मी धोकादायक आहे माझ्याकडे तुम्ही कधीच येऊच नका मला तुम्ही शिवू नका,स्पर्श करु नका,मला तुम्ही पिऊ नका, तुम्ही, माझ्याकडे तुम्ही फिरकू नका, तुम्ही चांगले रहा तुमचा परिवार चांगला ठेवा, असलेला तुमचा मानसन्मान प्रतिष्ठा इज्जत कायम राखा, तुम्ही सुदृढ रहा चांगले रहा निरोगी रहा पोरा बाळांचे शिक्षण करा,लग्न सोहळे आनंदाने पार पाडा मी कधीच तुमच्याकडे येणार नाही तुम्ही माझ्याकडे कधीच येऊ नका हीच एक विनंती तुम्हाला करते होय मी मदिराच बोलतेय !

**दयानंद काळुंके, अणदूर ता तुळजापूर**




# सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; मतदारांनी नावे तपासून दावे-हरकती नोंदविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत २४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र मतदारांनी आपले तसेच कुटुंबातील सदस्यांचे नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याची तपासणी करून आवश्यक असल्यास दावे व हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक १ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रारूप मतदार यादी मतदारांच्या माहितीसाठी व तपासणीसाठी सर्व संबंधित मतदान केंद्रे, तहसील कार्यालय, सोलापूर येथील निवडणूक शाखा, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदारांनी प्रारूप यादीमध्ये आपले नाव, पत्ता, वय, लिंग, मतदार ओळखपत्र क्रमांक (EPIC) तसेच मतदान केंद्राची माहिती तपासावी. नावामध्ये काही त्रुटी असल्यास किंवा नाव समाविष्ट नसल्यास विहित नमुन्यात अर्ज करून दुरुस्ती अथवा नाव समाविष्ट करण्याची कार्यवाही करता येणार आहे.

दावे व हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO), सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (ERO) तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत अर्ज सादर करता येतील.

विविध अर्जांसाठी नमुना ६, ७ व ८

नमुना क्र. ६ (Form 6) : नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी. दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांसाठी हा अर्ज करता येईल.

नमुना क्र. ७ (Form 7) : मतदार यादीतील चुकीची अथवा मृत/स्थलांतरित व्यक्तीची नोंद वगळण्यासाठी किंवा नाव वगळण्याबाबत हरकत नोंदविण्यासाठी. नमुना क्र. ८ (Form 8) : मतदार यादीतील दुरुस्ती, जन्मतारीख/वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता बदल, अपंगत्वाची नोंद किंवा नवीन ई-एपिक (ए-एझखउ)/नवीन मतदार ओळखपत्रासाठी. नागरिकांना Voter Services Portal (voters.eci.gov.in) व Voter Helpline pp द्वारेही ऑनलाइन अर्ज व आवश्यक कार्यवाही करता येणार आहे. महाराष्ट्रातील प्रारूप मतदार याद्यांसाठी अधिकृत निवडणूक विभागाची माहितीही उपलब्ध आहे. मतदारांनी मतदानाचा हक्क अबाधित राहण्यासाठी प्रारूप मतदार यादीत आपले नाव तपासून, आवश्यक असल्यास दि. ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी दावे अथवा हरकती नोंदवाव्यात. तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने या पुनरीक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक १ यांनी केले आहे.

### भरीव मदत केली तरच शेतकरी वाचेल, अन्यथा...; खासदार ओमराजेंचं सरकारला साकडं!

# मराठवाड्यात महाभयंकर दुष्काळाची दाहकता, सगळीकडे भयाण परिस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : पावसाने दिलेल्या दांडीमुळे राज्यातील बहुतांश भागातील बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अशातच मराठवाड्यावर महाभयंकर दुष्काळाचे संकट घोंगावत आहे. धाराशिव जिल्ह्यातही लाखो हेक्टरवर पेरणी केलेलं सोयाबीन अक्षरशः करपून गेलं आहे. ही दुष्काळाची दाहकता सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आता सरकारचे प्रतिनिधी असलेल्या शिवसेना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी धाराशिवमध्ये स्वतः सोयाबीनच्या शेतात जात शेतकऱ्यांशी संवाद साधला आहे. दुष्काळाची दाहकता भयंकर आहे. सोयाबीनची पेरणी करण्यासाठी केलेला खर्चही निघणार नाही, अशी एकंदरीत परिस्थिती जिल्ह्यात आहे. सगळीकडे भयाण परिस्थिती, शेतकऱ्याच्या पदरात काही पडेल अशी सध्या स्थिती नसल्याची भीती शिवसेना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, आगामी काळात बळीराज्याच्या दारात सावकार येऊन बसणार आहे, बँक दारात येऊन बसणार आहे आणि शेतकऱ्यांनी केलेला खर्चही निघत नाही, त्याचे उत्पन्न शून्य आहे. पीक करपणे म्हणजे शेतकऱ्यांचा प्रपंच करपला आहे. राज्य सरकारने भरीव मदत केली तर शेतकरी वाचेल, नाही तर शेतकरी वाचणार नाही. असेही सत्ताधारी खासदार ओमराजे म्हणालेत. आता किंतु परंतु आर्थिक स्थिती या गोष्टी बोलण्यापेक्षा जर शेतकरी जगवायचा असेल तर त्याला सरसकट भरीव मदत करणे गरजेचं आहे. शेतकऱ्यांच्या बांधावरून ओमराजे यांनी सरकारकडे साकडं घातलं आहे. आता शंभर टक्के शेतीच नुकसान झाला आहे, याचा अहवाल राज्य सरकारपर्यंत पोहोचवा, असं मी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितलंय. पिक विमा योजनेत ट्रिगर समाविष्ट करावेत, यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्याची कारवाही सुरू असल्याचेही त्यांनी सांगितलं.

पिक विम्यासाठी, पीक कापणी प्रयोगासाठी शेतात शिल्लक काहीच राहणार नाही. सॅटॅलाइटमधून पाहिल्यावर सगळं हिरवं दिसतं. पण शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्याला मानसिक आणि आर्थिक आधार दिला नाही तर आत्महत्या वाढतील. ठाकरेंचे आमदार कैलास पाटलांनी व्यक्त केलेली भीती बरोबर असल्याचे सांगत खासदार ओमराजे निंबाळकर यांनाही तीच भीती बोलताना व्यक्त केली आहे.

मराठवाड्यातील विविध प्रश्नाबाबत वाचा फोडण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सरकार विरोधात तुमसे ना हो पायेगा आंदोलन करण्यात येणार आहे. अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी दिलीये.

मराठवाड्याचा अनुशेष तसेच शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असून स्थानिक प्रश्न विरोधात हे आंदोलन केले जाणार आहे. तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले जाणार आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या घोषणांची आजची परिस्थिती काय याबद्दल हे आंदोलन केले जाणार आहे. कर्नाटक प्रमाणे महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करावा असेही कैलास पाटील यावेळी म्हणाले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आत्महत्येचे गुड उलगडले; नळदुर्ग शहर हादरले, सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने तिन मुलांसह केली आत्महत्या

## सोन्याच्या पाटल्या व ॲटो रिक्षा घेण्यासाठी माहेरून पैसे आण म्हणून केला होता छळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग सारख्या ऐतिहासिक शहरातील ऐतिहासिक किल्ल्याम ध्ये तब्बल ९५ फूट उंच असलेल्या उपल्या बुरुजावरून आपल्या तीन मुलासह विवाहितेने आपले जीवन संपवले या आत्महत्येचे गुड उलगडले आसून नळदुर्ग पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिति अशी अश्विनी मनोहर पौळ वय वर्ष ३० अजिंक्य मनोहर पौळ ५ वर्ष क्रांती मनोहर पौळ २:५ आडीज वर्ष आणि विरा मनोहर पौळ २:५ आडीज वर्ष ह्या जुळ्या मुली होत्या अश्विनी हे गेल्या तीन महिन्यापासून आपल्या वडिलांकडे म्हणजे माहेरी म्हणजे व्हंताळ या गावी राहत होती .

गेले अनेक महिन्यापासून विनाकारण सासरच्या लोकांनी अश्विनीचा जाच व्हायचा नाहक त्रास देत होते मला सोन्याच्या पाटल्या व ॲटो रिक्षा घ्यायचे आहे आणि तुझ्या माहेर कडून घेऊन ये अशा पद्धतीचा जाच सुरु होता मानसिक व शारीरिक त्रास सहन करत संसाराचा गाडा हाकत होती एक म्हण अति तिथं माती या म्हणी प्रमाणे अश्विनीच्या मनी डोक्यात विचार प्रवृत्त करू लागले त्याचाच वेध घेऊन किल्ला पाहाण्यासाठी आपल्या मुलांसह नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यामध्ये दाखल झाल्या त्यांची किल्ल्यातील नोंद डायरीला नोंद झाली काही क्षणात अश्विनी तिचे तिन मुले घेऊन उपली बुरूजाकडे प्रणाय झाली उपल्या बुरुज गाठला आणि सासरच्या जाचाला कंटाळून चक्क ९५ फूट उंच असलेल्या आपल्या बुरुजावरून खाली जमिनीवर उडी घेतली आणि आत्महत्या केली याला सर्वस्वी जबाबदार सासरकडील मंडळे आहे तिच्या सासरच्या मंडळींकडून होत आसलेला त्रास तिचे पती १ ) मनोहर अंकुश पौळ २ ) अंकुश पंढरीनाथ पौळ ३) कालिंदा अंकुश पौळ , ४) आत्या सासु विमलबाई हे सर्व राहणार अंबुलगा पौळ तालुका निलंगा जिल्हा लातूर यांच्या सर्वाच्या जाचा मुळेच मानसिक शारीरिक छळ करत हुंड्याच्या बदल्यात तो मला सोन्याच्या पाटल्या व रिक्षा साठी पैसे घेऊन ये म्हणून सतत छळ करत होते या हा छळ तिने आजतागायत सहन केला त्यांचे बोलणे राहाणे मारहाण करणे सहन झाले नाही सासरच्या मंडळींनी कसल्याही प्रकारची दया मया केली नाही वारंवार विनंती करून सुद्धा त्यांनी खुप मोठ्या प्रमाणात छळ करीतच रहिले सासरच्या जाचाला कंटाळून विवाहित अश्विनी मनोहर पौळ व तिचे तीन मुले यांच्यासह नळदुर्ग येथे ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी येण्याचे सांगून त्यांनी आपल्या मुलांसह उपल्या बुरुजावर पोहोचले काही क्षणात आपल्या बुरुजाच्या एकूण ७७ पायऱ्या असून त्या उपल्या बुरुजाची साधारणता शंभर ९५ फूट उंच आहे उपल्या बुरुजावरून १ मुलगा व दोन मुली खाली फेकल्या गेल्या आणि नंतर स्वतः उडी घेतल्याने मुलांसह स्वतःचे




जीवन संपवले हे सर्व या भयानक प्रकार पाहुण नळदुर्ग शहरांमध्ये एकच खळबळ उडाली होती की विवाहीत महिला आत्महत्या केली नळदुर्ग शहर हादरून गेलं आणि आत्महत्येचे गुड उलगडले अश्विनीचे वडील तानाजी शिवाजी मोहिते रा व्हंताळ ता उमरगा व्यवसाय शिक्षक यांनी नळदुर्ग पोलिस ठाण्यात रात्री २:३० वाजता फिर्याद दाखल केली हि फिर्याद नळदुर्ग ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगुणे यांनी ही फिर्याद दाखल केली यावेळी प्रत्यक्ष स्थळी तुळजापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी मनोहर पाटील , पोलिस निरीक्षक रविंद्र गायकवाड सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक इरकत सय्यद यांनी







भेट देऊन पाहणी केली मयत अश्विनी, क्रांती, अजिक्य आणि विरा यांना उचलून नळदुर्ग येथे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले डॉ चंचला बोडके डॉ जिडगे यानी प्रथमोपचार नंतर दोन मुली ह्या रेफर धाराशिव येथे हलविण्यात आले त्यामधुन एक मयत झाली वरिल आरोपी चौघा विरोधी फिर्यादीच्या जबावावरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड हे करित आहे.

# क्राइम पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी विशाल भांगे तर खजिनदार रवी मस्के, सचिव परशुराम कोकणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर क्राइम पत्रकार संघाच्या सन २०२६ -२७ या वर्षासाठी नवराष्ट्रचे पत्रकार विशाल भांगे यांची अध्यक्षपदी तसेच खजिनदार म्हणून रवी मस्के आणि सचिव म्हणून परशुराम कोकणे यांची एकमताने निवड करण्यात आली. शासकीय विश्रामगृहामध्ये शुक्रवारी दुपारी पत्रकार विनायक होटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. प्रारंभी लोकमतचे आप्पासाहेब पाटील यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर पुण्यनगरीचे भरतकुमार मोरे, कटूसत्यचे पांडुरंग सुरवसे यांच्यासह अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली. क्राइम पत्रकारांच्या एकजुटीसाठी आणि विविध उपक्रमाचे आयोजन पुढील काळात करण्यासाठी सर्वांनी एकत्रीत येवून काम करण्याचे यावेळी ठरवण्यात आले.

अध्यक्ष - विशाल भांगे, उपाध्यक्ष विजयकुमार बाबर, इरफान शेख, विश्वभूषण लिमये, योगेश तुरेराव, कार्याध्यक्ष अश्विनी तडवळकर, आप्पासाहेब पाटील, सचिव परशुराम कोकणे, सहसचिव शहानवाज शेख, इब्राहीम मुजावर, खजिनदार रविंद्र मस्के, सहखजिनदार लक्ष्मीकांत शिंदे, दिनेश शिंदे, प्रसिध्दीप्रमुख तौसिफ शेख, प्रमोद तुपसमुद्रे, यासिन शेख, कार्यकारणी सदस्य सुर्यकांत आसबे, शिवाजी सुरवसे, विनायक होटकर, उमाकांत चौडे, भरतकुमार मोरे, वैभव गंगणे, दिगंबर इप्पलपल्ली,इम्रान सगरी,विनोद कामतकर, रोहन नंदाणे, सल्लागार - अविनाश कुलकर्णी, राजकुमार नरूटे, भगवान परळीकर, संजय येऊलकर, पांडुरंग सुरवसे, विधी सल्लागार - ॲड. प्रदीपसिंह रजपूत, ॲड. संतोष न्हावकर यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर सर्व नवीन पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला.

याबैठकीला सागर सुरवसे, आफताब शेख, अभिषेक आदप्पा, विक्रांत कालेकर, गौसपाक पटेल, अनिकेत गायकवाड, नागेश श्रीचिप्पा, राहुल रणदिवे, संतोष कासे, रवि ढोबळे, राजकुमार पवार, चंदन बोल्लू, सौरभ वाघमारे, जागृत रणदिवे, अकबर बागवान, फय्याज शेख यांच्यासह पत्रकार मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# दुष्काळाचे सावट गंभीर; सरसकट मोफत धान्य, रोजगार व चारा छावण्या तातडीने सुरु करण्याची विकीबाबा चौधरी यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून शेतकरी, शेतमजूर, अल्पभूधारक आणि सर्वसामान्य कुटुंबांसमोर पाणी, अन्न आणि रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.



दुष्काळामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांचे उत्पन्न घटले असून शेतमजूर व रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांच्या हाताला पुरेसे काम उपलब्ध होत नाही. त्याचबरोबर पशुधनासाठी चारा व पाण्याची समस्या गंभीर बनत आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने दुष्काळग्रस्त जनतेला तातडीने सरसकट मोफत धान्य वाटप करावे, रोजगाराची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करून स्थानिक मजूर व कामगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा तसेच जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (एकतावादी) रोजगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी यांनी केली आहे.

दुष्काळग्रस्त जनतेला केवळ आश्वासनांची गरज नाही, तर प्रत्यक्ष मदत आणि तातडीच्या शासकीय उपाययोजनांची गरज आहे. शासन व प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन विलंब न करता आवश्यक उपाययोजना कराव्यात.

शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी हा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देत असून, मागण्यांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी विकीबाबा चौधरी यांनी केली आहे.

- विकीबाबा चौधरी
प्रदेशाध्यक्ष, रोजगार आघाडी
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया
(एकतावादी)

# सिंदखेडराजा तालुका माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे अध्यक्ष अरुण तौर यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत सकल मातंग समाजाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या तालुकास्तरीय समारोपीय जयंती उत्सवानिमित्त पत्रकारिता व सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष तथा पत्रकार अरुण तौर यांना भाजपाचे ज्येष्ठ नेते व सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार तोतारामजी कायंदे,शिवसेनेचे जेष्ठ नेते विजय अंभोरे व भाजपाचे राज्याचे महामंत्री सर्जेराव जाधव यांच्या हस्ते प्रसिद्ध कादंबरी फकीरा व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मंचकावर भाजपाचे प्रवक्ते विनोद वाघ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर,लहुशस्त्र सेनेचे संस्थापक अध्यक्ष संजूबाबा गायकवाड ,माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, माजी सरपंच भिकाभाई नेमाडे आदी नेते मंडळी उपस्थित होते.या कार्यक्रमाला बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

# टाकळीवाडीत विद्यार्थ्यांनी अनुभवला गणेश मूर्तिकलेचा जिवंत वारसा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : स्थानिक कला-संस्कृतीचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा तसेच श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व रुजावे, या उद्देशाने श्री सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी येथील मुख्याध्यापक श्री. पद्मभूषण शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व शिक्षकांनी टाकळीवाडीतील स्थानिक कुंभार परिवारास सस्नेह भेट देऊन गणेश मूर्तिकलेची प्रत्यक्ष माहिती घेतली.

या उपक्रमादरम्यान कुंभार बांधव ज्या आत्मीयतेने, कौशल्याने आणि कष्टाने सुबक व आकर्षक गणेशमूर्ती साकारतात, ती कला विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्सुकतेने पाहिली. मूर्ती तयार करताना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी घेतली जाणारी काळजी आणि पर्यावरणपूरक घटकांचा केलेला वापर पाहून सर्वच जण प्रभावित झाले.

वार्षिक १५ ते २० हजार मूर्तींचे उत्पादन; बाहेरगावी मोठी मागणी:

टाकळीवाडीतील या कुंभार परिवाराकडून दरवर्षी सुमारे १५ ते २० हजार लहान-मोठ्या गणेशमूर्ती तयार करून इतर विविध गावांमध्ये व शहरांमध्ये पाठवल्या जातात. याशिवाय विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी दरवर्षी तब्बल ४० ते ५० भव्य व देखण्या मूर्ती तयार करून दिल्या जातात. टाकळीवाडीच्या लौकिकात भर घालणाऱ्या या उद्योगाचे आणि कलाकौशल्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

शाळेच्या वतीने सत्कार व मनःपूर्वक आभार:

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कारखान्यात जाऊन स्थानिक व्यवसाय, मूर्तिकला आणि तिचे महत्त्व जवळून समजून घेण्याची मोलाची संधी मिळाली.

या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. पद्मभूषण शेट्टी, शिक्षक श्री. संजय चौगुले, श्री. तात्यासो आवटी, श्री. संजय माळी, सौ. प्रिया चौगुले व सौ. आरती मादनाईक यांच्यासह सर्व शिक्षकवृंदाने या कलेचा वारसा जपणाऱ्या संपूर्ण कुंभार परिवारास त्यांच्या पुढील वाटचालीस व व्यवसायासाठी उदंड शुभेच्छा दिल्या. तसेच ही अप्रतिम कलाकृती व ज्ञान विद्यार्थ्यांसमोर खुले करून दिल्याबद्दल कुंभार परिवाराचे मनापासून आभार मानले.



## व्यसनमुक्तीसाठी महाकाव्य लिखाणाचे प्रकाशन होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना, चळवळीला प्रेरणा देणारी त्यांचं मनोबल वाढवणारे व व्यसनामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची जाणीव करून देणारे महाकाव्य लिखाण खास करून वाचकांसाठी प्रकाशित करीत आहोत.

### जिल्हाधिकारी एस. कीर्तीकेयन यांनी दिला जाहीर आदेश

# सोलापूर जिल्हात डॉल्बी, सिस्टीम लेझर लाईटला बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या आगमन व विसर्जनाच्या डॉल्बी सिस्टीम लेझर लाईट शोच्या , सोलापूर जिल्ह्यात बंदी घालण्यात आलेली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या व सुरक्षितेच्या धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी एस. कीर्तीकेयन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३(१,) याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत हा प्रतिबंध १३ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत लागू राहणार आहे.

डॉल्बी सिस्टमच्या मोठ्या आवाजामुळे बरोली सहभागी होणाऱ्या कान व छातीशी संबंधित त्रास होण्याची शक्यता असून, कायम स्वरूपी अपंगत्व किंवा जीवितास धोका निर्माण झालेल्या घटना यापूर्वी निदर्शनास आले आहे. लेझर लाईट थेट डोळ्यावर पडल्यास विशेषता लहान मुलांना तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्याच्या पडद्याला व द बुबळाला मुलगा होण्याची शक्यता असल्याचे आदेशात नमूद केले आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, मधील कलम १६३ (१) अनुसार मानवी जीवित आरोग्य किंवा सुरक्षितता धोका निमर्ण होण्याची शक्यता, आल्यास तातडीने प्रतिबंधात्मक उपाय करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव



मंडळाच्या स्थापना व विसर्जनाच्या आयोजित मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टीम लेझर लाईट शो चा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या फौजदारी कारवाई करण्यात येईल असा इशाराही सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एस. कीर्तीकेयन यांनी दिला आहे.

# आमदार आवताडे यांनी जाणून घेतल्या पाटकळच्या समस्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत स्वराज्य ग्राम मुक्काम मोहिमेअंतर्गत तालुक्यातील पाटकळ येथे भेट देऊन गावातील विविध समस्या सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी समाधान आवताडे यांनी केली व यावेळी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले प्रश्न मांडले,

एवढे आमदार समाधान आवताडे यांनी सरकारी दवाखाना तलाठी अंगणवाडी तलाठी व नवीन ग्रामपंचायत कार्यालय जिल्हा परिषद शाळा व अभ्यासिका, तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यात भेट देऊन तेथील सुविधा व आवश्यक व्यवस्था असल्याची संपूर्ण माहिती घेतली. एवढी सहाय्यक आयुक्त जगन्नाथ सुरवसे डॉक्टर तानाजी भोसले डॉक्टर बोर्डे व डॉक्टर विशाल कुंभार व डॉक्टर प्रमोद अदलिंगे डॉक्टर सत्यजित लामखाने, समाधान साळुंखे , मुमताज आतार, उपविभागीय पोलिस अधिकारी शिवपुजे, प्रांत अधिकारी बि आर माळी, तहसीलदार मदन जाधव, सरपंच ऋतुराज बिले यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ करावे : मल्लिकार्जुन मसुती

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ. राधाकृष्णन जयंती निमित्त शिक्षक दिन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट - माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात संवाद संपत चालला आहे, पूर्वी सनदशीर मार्गाने चर्चा करून मागण्या मान्य करून घेण्याची पद्धत होती. आता मात्र आंदोलन, मोर्चे, संप, उपोषण, हरताळ मारहाण आदी मार्ग स्वीकारले जात आहेत अशा स्थितीत विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवा प्रगल्भ करण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, नैतिक मूल्ये शिक्षकांनी रूजवावीत असे प्रतिपादन मल्लिकार्जुन मसुती यांनी व्यक्त केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा सौरभ भस्मे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मोबाईल, इंटरनेट, व्हाट्सअप, ट्विटर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थ्यांवरील संस्कार लुप्त होत आहेत, त्यामुळे सामाजिक स्थिती बिकट झाली आहे. ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर शिक्षकांनी महत्त्वाची भूमिका घेतली पाहिजे.

मलकप्पा भरमशेट्टी म्हणाले की, चांगला शिक्षक विद्यार्थ्याला केवळ शिकवत नाही, तर त्याला घडवतो. शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा सदैव आदर केला पाहिजे.

प्रारंभी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले.

### शिक्षक चुकला तर समाजाची अधोगती

**शिक्षक ज्ञानी असतो तो विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतो, त्यामुळे तो समाजाचा मार्गदर्शक मानला जातो, शिक्षक चुकला तर संपूर्ण पिढी बरबाद होते, समाज अधोगतीला जातो, हा डॉ राधाकृष्णन यांच्या विचाराचा मूलभूत संदेश आहे असे प्रा सौरभ भस्मे यांनी मार्गदर्शन करताना अधोरेखित केले.**

## चिमुकले विद्यार्थीच बनले शिक्षक वैनतेय विद्यामंदिरात 'शिक्षक दिन' उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - निफाड : भारताचे दुसरे राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम करून आनंददायी पद्धतीने शिक्षक दिन उत्साहात साजरा केला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे शाळेचे मुख्याध्यापक गोरख सानप यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. किरण खैरनार, मनिषा चव्हाण यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी ओजस्वी माळी हिने मुख्याध्यापिकेचे कामकाज बघितले. विद्यार्थ्यांनी दिवसभरातील सर्व वर्गाच्या अध्यापनाच्या कामाचा अनुभव घेतला. यात त्यांनी विविध विषयाच्या अध्यापनासह खेळ, गाणी, गोष्टी अशा विविध प्रकारे आपले अध्यापन कौशल्य सिद्ध केले.यासाठी या चिमुकल्यांना त्यांचे शिक्षक संजय जाधव,कल्पना पेठे, विजया पवार यांनी मार्गदर्शन केले. किरण खैरनार, सविता रोहम, सुजाता पाटील यांनी शाळेतील शिक्षक व शिक्षक दिनानिमित्त नवनिर्वाचित शिक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार केला. ओवी म्हैसधुणे, रेयांश कोल्हे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

बालवयातच विद्यार्थ्यांना नेतृत्व, सभाधीटपणा,नियोजन, संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिक्षकाच्या कार्याचा अनुभव देणाऱ्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे व विश्वस्त मंडळ तसेच पालकांनी अभिनंदन केले. या उपक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

आज वर्गात शिक्षक म्हणून काम करतांना खूप छान वाटले तसेच वर्गात मुले त्रास देतात, शिक्षकांच्या सूचना पाळत नाही यामुळे कळाले की शिक्षकांना किती त्रास सहन करावा लागत असेल.. आजपासून आम्ही मुलांनी शिक्षकांच्या सर्व सूचना व आदेशांचे पालन करण्याचा संकल्प केला आहे.

- काव्या कराड, विद्यार्थी शिक्षक, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर, निफाड

निफाड : 'शिक्षक दिना' निमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अध्यापनाचा अनुभव घेतांना वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थी व शिक्षकवृंद.

## मैंदर्गी कन्नड शाळेत शिक्षकांना गुरुवंदना करत विद्यार्थ्यांनी साजरा केले शिक्षक दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट - तालुक्यातील मैंदर्गी कन्नड मुला-मुलींच्या शाळेत विद्यार्थ्यांनीच आपले शिक्षकांना गुरुवंदन करत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा केले.

सकाळी प्रार्थनेच्या वेळेत शाळेतील सर्व शिक्षकांना गेट बाहेर थांबवून फित कापायला सांगितले मुलांनी पुष्पवृष्टी करत आत स्वागत केले त्यांना कार्यक्रमाच्या मंचापर्यंत आणले व सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवत त्यांचे गुरुवंदना केले

मुख्याध्यापक शिवानंद गोगाव व अंबाराय उजनी यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या भाव चित्रास पुष्पवृष्टी करून अभिवादन केले शाळेतील सर्व मुला-मुलींनी ओळीत मंचावर येऊन शिक्षकांना पुष्प व भेट वस्तू देऊन त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले सर्व शिक्षकांनी मुलांना उत्तमरित्य शिकवून उत्तम नागरिक होण्याचे आशीर्वाद दिले सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात टाळी वाजवून सर्व शिक्षकांचे गुणगान करत आपले गुरुवंदना व्यक्त केले.



विद्यार्थ्यांनीच नियोजन केलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना खूप खूप आनंद झाले मुलांची शाळेचे मुख्याध्यापक शिवानंद गोगाव मुलींची मुख्याध्यापिका गुरुदेवी आलमेल ज्येष्ठ शिक्षिका सुशीलाबाई स्वामी रमेश जु जगार संगीता राठोड अश्विनी संपर्गी अश्विनी पाटील सुप्रिया बिराजदार भोरम्माजी विजय लक्ष्मी भैरवटगी, शिवानंद हिप्परगी सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी मुले व मुलींनी शिक्षकांचे गुणगान करत आपले मनोगत व्यक्त केले.

## तांदुळवाडी शाळेत शिक्षक दिन उत्साहात; गुरुजनांचा विद्यार्थ्यांकडून भावपूर्ण सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब, प्रतिनिधि सुधाकर रणदिवे, दि. ५ सप्टेंबर : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी पालक श्री. आश्रुबा लिमकर यांच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती असलेल्या आदराच्या भावना व्यक्त करत कविता, गीते आणि वक्तृत्वाच्या माध्यमातून शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून शिक्षकांबद्दलचा आदर, प्रेम आणि कृतज्ञता दिसून आली.



कार्यक्रमात सहशिक्षिका श्रीमती आशा पवार, श्रीमती रसिका आगरकर, सहशिक्षक श्री. संतोष मोहिते तसेच मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने यांनी आपल्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. आपल्या जीवनाला योग्य दिशा देणारे, संस्कार घडविणारे आणि यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देणारे शिक्षक हे आपल्या जीवनातील खरे मार्गदर्शक असतात, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते हे अतूट आणि जिव्हाळ्याचे असून, आपल्या जीवनात घडविणाऱ्या प्रत्येक शिक्षकांबद्दल सदैव आदर व कृतज्ञतेची भावना असली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमास अंगणवाडीच्या श्रीमती मंदाकिनी खोसे, श्रीमती संगीता काळे, श्रीमती सागरबाई लिमकर यांच्यासह अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस उपस्थित होत्या. यावेळी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आशा पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. संतोष मोहिते यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

### चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साकारल्या मुख्याध्यापक-शिक्षकांच्या भूमिका; आत्मविश्वासपूर्ण अध्यापनाने वेधले सर्वांचे लक्ष

## दुधनीच्या जिल्हा परिषद शाळेत 'एक दिवस शिक्षक' उपक्रमाने रंगला शिक्षक दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी निंगप्पा निंबाळ - भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा, दुधनी येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेत 'एक दिवस शिक्षक' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. इयत्ता तिसरी व



चौथीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मुख्याध्यापक व शिक्षकांच्या भूमिका साकारल्या. विद्यार्थ्यांनी विविध वर्गांमध्ये जाऊन अत्यंत आत्मविश्वासाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने अध्यापन केले.

चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडताना वर्गातील शिस्त, वेळेचे नियोजन, विषयाचे सादरीकरण तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची पद्धत यांचा उत्तम अनुभव घेतला. 'आजचा विद्यार्थी उद्याचा शिक्षक' या संकल्पनेची जाणीव करून देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रेरणादायी ठरला. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण अध्यापनाचे उपस्थित शिक्षकांनी कौतुक केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन शिक्षकांचा सन्मान केला. तसेच शिक्षकांचे आशीर्वाद घेतले. विद्यार्थ्यांच्या या प्रेमळ भावना पाहून शिक्षकही भारावून गेले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्ञानासोबतच चांगले संस्कार, प्रामाणिकपणा, शिस्त, मेहनत आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व समजावून सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःचा तसेच समाजाचा विकास साधावा, असा संदेश देत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य, आत्मविश्वास, जबाबदारीची भावना आणि अध्यापनाची गोडी निर्माण होण्यास मदत झाली. शिक्षक दिन केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या अनुभवातून शिकण्याचा आनंद देणारा ठरला.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. पोमू राठोड, संजीवकुमार बेण्णीसूर, रविकुमार कोरचगाव, सुहास पवार, श्रीमती अंजली गुंजोटे तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा हा प्रेरणादायी आणि संस्मरणीय कार्यक्रम आनंदी वातावरणात संपन्न झाला.